**शहराच्या मध्यवर्ती भागात नवीन फ्लॅट्स विकणे आहे**

विष्णुप्रिया हाईट्समध्ये पहिला मजला कमर्शिअल आहे. उर्वरित ४ रेसिडेंसिअल 2BHK फ्लॅट्स प्राईम लोकेशन सह विकणे आहे. (दोन महिन्यात ताबा)
पत्ता : दक्षिण कसबा, आनंद मंगल कार्यालयाजवळ, दाते गणपती मंदिराजवळ
मो. : ९८८१२४५०२७

एकाच १RK फक्त मुली/महिलाकरिता भाड्याने देणे आहे



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



**मंगल कार्यालय**

लग्न, रिसेप्शन, साखरपुडा, मुंज, बारसे, वाढदिवस नव्या स्वरूपात सर्व सोयी सुविधांसह उपलब्ध.

**सौभाग्य मंगल कार्यालय**

आरटीओ जवळ, विजापूर रोड, सोलापूर, मो.: ९०९६९६६२२२



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २१६ वा | गुरुवार, दि. ०३ एप्रिल २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# सोलापूर बाजार समितीच्या निवडणुकीत भाजपचे दोन्ही देशमुख पुन्हा आमने-सामने ?

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यात कांद्यासाठी लौकिक मिळविलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत माजी सभापती तथा भाजपचे ज्येष्ठ आमदार विजयकुमार देशमुख यांनी न उतरण्याची भूमिका घेतली असताना दुसरीकडे त्यांचे पक्षांतर्गत प्रतिस्पर्धी म्हटले जाणारे आमदार सुभाष देशमुख हे मात्र आपले पॅनेल उभे करण्यावर ठाम आहेत.

आपल्या सोबत कोणी आल्यास त्यांच्यासोबत आणि कोणी न आल्यास त्यांना सोडून निवडणूक लढविण्याचा पवित्रा जाहीर केला आहे.

या निवडणुकीत १८ जागांसाठी एकूण ४३९ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. दरम्यान, या अर्जांपैकी समितीचे माजी सभापती, माजी आमदार दिलीप माने आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातील काँग्रेसचे नेते सुरेश हसापुरे यांच्या उमेदवारीला हरकत घेण्यात आली असून, त्यावर निवडणूक अधिकारी किरण गायकवाड यांच्यासमोर सुनावणी झाली. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर निर्णय उद्या बुधवारी



जाहीर करण्यात येणार आहे.

भाजपचे आमदार, माजी सहकार व पणनमंत्री सुभाष देशमुख यांनी आपली भूमिका प्रथमच जाहीर केली आहे. मागील २०१७ सालच्या निवडणुकीत सुभाष देशमुख आणि विजयकुमार देशमुख हे दोघेही मंत्रिपदावर असताना एकमेकांच्या विरोधात लढले होते. यात सुभाष देशमुख यांचे पॅनेल पराभूत झाले होते.

यंदा मात्र आमदार विजयकुमार देशमुख यांनी निवडणुकीत न उतरण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, बाजार समिती कोणाच्या ताब्यात द्यायची आणि कोणाला बाजार समितीपासून दूर ठेवायचे, याची निर्णायक भूमिका त्यांच्याकडे राहणार असल्याचे सूचक विधान त्यांनी केले आहे. ही निवडणूक ताकदीने वाढविली जाणार असून, त्यात कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

या घडामोडींतून बाजार समितीची निवडणूक भाजपच्या दोन्ही आमदार देशमुखांमध्ये होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. आमदार विजयकुमार देशमुख यांनी महाविकास आघाडीचे माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, आमदार दिलीप माने, काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब शेळके आदींना सोबत पॅनेल उभे करण्याची तयारी सुरू केल्याचे सांगण्यात आले. त्या दृष्टीने त्यांची खूप यंत्रणा जोरात कामाला लागली आहे. तर दुसरीकडे भाजपाचे आमदार सुभाष देशमुख आणि अक्कलकोटचे याच पक्षाचे आमदार सचिन कल्याणशेट्टी हे दोघे एकत्र येण्याच्या हालचाली सुरू झाल्याचे बोलले जाते.

## मंगळवेढा-बोराळे रस्त्यावर उड्डाणपूल किंवा अंडरपाससाठी खा. प्रणिती शिंदेंचा पाठपुरावा

### केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून ग्रीन सिग्नल

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** सोलापूर जिल्ह्यातून जाणारा रत्नागिरी - नागपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६६ मंगळवेढा शहरातून जातो. या मागार्मुळे मंगळवेढा ते बोराळे जाणारा रस्ता बंद झाला आहे. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असुन या महामार्गावर बोराळेकडे जाण्यासाठी उड्डाणपूल किंवा अंडरपास करण्याची मागणी खासदार प्रणिती शिंदे यांनी केली आहे. याप्रश्नी खासदार शिंदे यांनी मंगळवारी केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची निवेदन सादर केले आहे. यावर माननीय गडकरी साहेबांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याची माहिती प्रणिती शिंदे यांनी दिली. यावेळी त्यांच्या समवेत मंगळवेढ्यातील प्रफुल्ल सोमदळे व विनायक उर्फ आनंद हजारे उपस्थित होते.



मंगळवेढा बोराळे रस्त्याचा प्रश्न सोडविण्यासाठी खासदार प्रणिती शिंदे यांनी केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या दिल्ली येथील निवासस्थानी भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. सोलापूर लोकसभा मतदार संघातील सोलापूर-कोल्हापूर हा राष्ट्रीय महामार्ग मंगळवेढा शहरातून जातो. या महामार्गाच्या निर्मितीवेळी मंगळवेढा बोराले या रस्त्याच्या अंडरपास अथवा उड्डाणपुलाचा समावेश होणे गरजेचे होते. मात्र तो उड्डाणपूल अथवा अंडरपास अद्यापही न झाल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे खासदार प्रणिती शिंदे यांनी नमूद केले. तसेच सोलापूर हून मंगळवेढा कडे येताना मंगळवेढ्यातील उड्डाणपूलस एकूण सहा रस्ते कनेक्ट होतात, सदर रस्त्याला बायपास रोड देखील कनेक्ट होतो, बायपास वरून लोडेड 16 चाकी वाहने व एसटी देखील उड्डाणपूला खालून जातात यांना व्यवस्थित टर्न घेता येत नाही, त्यामुळे वाहनांची जाताना उड्डाणपुलाखाली कोंडी होते, या बाबीचा देखील या बैठकीत विचार करण्यात आला, यावर गडकरी साहेबांनी संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत स्वतः जागेवर जाऊन, परिस्थिती पाहून, योग्य ते रस्त्याचे अंतर वाढवावेत, जेणेकरून वाहने व्यवस्थित टर्न घेऊ शकतील आणि सुरक्षित जातील व नागरिकांचा जीव डोक्यात येणार नाही याची दखल घेण्यास गडकरी साहेबांनी आदेश दिलेले आहेत.

बोराळे हा रस्ता मंगळवेढ्यातील सर्वाधिक वापरातील रस्त्यांपैकी एक आहे. यामुळे बोराळे, अरळी, सिद्धपुर, मुंढेवाडी, राहटे वाडी, तामदर्डी, थानदरे आणि दामाजी नगर या गावांतील लोकांची सोय होते. मात्र सध्या याठिकाणी बोगदा नसल्याने ग्रामीण भागातील नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. तसेच मंगळवेढा शहराच्या पूर्व भागात राहणाऱ्या शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसत आहे. बोगदा नसल्यामुळे मंगळवेढ्यातील ७५,००० लोकांना शहरात यायला-जायला ३ ते ४ किलोमीटर जास्त अंतर कापावे लागत आहे. याचा परिणाम म्हणून जवळपास ६२,००० एकर शेतजमीनीची वहिवाट होत नसल्याचे वास्तव मांडून शेतकऱ्यांच्या होणाऱ्या नुकसानाकडे खासदार शिंदे यांनी मंत्री गडकरी यांचे लक्ष वेधले.

प्रणिती शिंदे यांनी गडकरी यांच्याशी बोलताना सांगितलं की, जर या रस्त्यावर उड्डाणपूल किंवा अंडरपास झाला तर वाहतूक कोंडी कमी होईल. रस्ता सुरक्षित होईल आणि ग्रामीण भागातील लोकांना मंगळवेढा शहरात येजा करणे सोयीचे होणार आहे. या बोगद्याच्या कामासाठी सोलापूर विभागातील महामार्ग प्राधिकरणाने ८४ लाख रुपयांचा प्रस्ताव तयार केला आहे. त्या प्रस्तावास तातडीने मंजूरी देऊन ग्रामीण भागातील जनतेची रस्त्याची समस्या सोडविण्याची विनंती खासदार शिंदे यांनी यावेळी नितीन गडकरी यांना केली.

दरम्यान, खासदार प्रणिती शिंदे यांच्या मागणीनुसार केंद्रीय वाहतूक मंत्री गडकरी यांनी देखील सकारात्मक प्रतिसाद देत. तातडीने या कामासाठी मंजुरी देण्याचा शब्द दिला असल्याची माहिती खासदार प्रणिती शिंदे यांनी दिली. प्रणिती शिंदे खासदार झाल्यापासून लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी खूप मेहनत घेतायत. स्थानिक लोकांना त्यांच्या या कामाचं कौतुक वाटतंय. त्यांच्यामुळे या रस्त्याचा प्रश्न सुटेल, अशी आशा मंगळवेढा शहर आणि तालुक्यातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## तीन दिवसाआड पाणी पुरवठा करण्याचा आराखडा करा - आ. सुभाष देशमुख

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दक्षिण मतदारसंघातील काही भागात पाणीपुरवठा पाच ते सहा दिवसाआड होत आहे. तो तीन दिवसाआड करता येईल का याबाबत आराखडा तयार करा, जुन्या पाईल लाईन काढून नवीन टाकाव्यात, पाण्याची साठपण क्षमता वाढवण्यासाठी नवीन टाक्यांचा प्रस्ताव द्यावा, झोपडपट्टी भागात अंगणवाडी सुरू करा, प्रलंबित ड्रेनेजची कामे सुरू करा, प्राणी संग्रहालय विकसीत करू सुरू करा, सुंदरम नगर येथील जलतरण तलाव सुरू करा, यासह अनेक सूचन आ. सुभाष देशमुख यांनी महापालिका आयुक्त आणि अधिकाऱ्यांना दिला.



मंगळवारी आमदार सुभाष देशमुख यांनी दक्षिण मधील शहरी भागात येर्णाया विविध कामांबाबत आढावा बैठक घेतली. यावेळी सुमारे 20 विषयांवर प्रदिर्घ चर्चा करण्यात आली. मतदारसंघातील अनेक भागात कचरा साठला आहे, त्याची स्वच्छता करावी, छत्रपती नगर, डोणगांव रोड, हिमगिरी नगर, विश्वकिरण पार्क, शिवरत्न नगर, ममता नगर, जयमहालक्ष्मी नगर, रेणुका नगर, साईधन नगर, एस.टी. कॉलनी आदी भागातील ड्रेनेजची उर्वरीत भागात कामे करावीत, याशिवाय रस्त्यांची कामे अर्धवट आहेत तीही पूर्ण करावीत, सुंदरम नगर येथील जलतरण तलावाचा क्रीडा विभाग आणि महापालिकेचा वाद मिटवून ते नागरिकांसाठी खुले करावे, सोसायटी चेअरमनसोबत महापालिकेने बैठक घेऊन ज्या मोकळ्या जागा आहेत, त्या लोकसहभागातून विकसीत कराव्यात, जुळे सोलापुरात नाट्यगृहासाठी नवीन जागा द्यावी, पूर्वीची जागा वन विभागाची असल्याने तेथे नाट्यगृह बांधता येणार नाही, त्याच्या शेजारची जागा द्यावी, आसरा ते विजापूर रोड रस्ता मंजूर आहे तो सुरू करावा, त्वरित तेथे खडीकरण करावे आदी सूचना आ. देशमुख यांनी केल्या.

**प्रस्ताव्याच्या पाठपुराव्यासाठी प्रतिनिधीची मागणी**

जी कामे करायची आहेत त्याबाबत प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तो महापालिकेने सरकारकडे पाठवावा आणि याचा पाठपुरवा करण्यासाठी महापालिकेचा एक स्वतंत्र प्रतिनिधी द्यावा जेणेकरून ही कामे लवकर होतील, अशाही सूचना आयुक्तांकडे केल्याचे आ. देशमुख म्हणाले.

**आ. देशमुख यांनी केलेल्या आणखी मागण्या**

पिण्याच्या पाणी पुरवठासाठी वापरात असलेल्या टाक्यांची स्वच्छत करावी, उत्कर्ष नगर, 2 नं. झोपडट्टी या भागात जुनी वापरात नसलेले सार्वजनिक शौचालये आहेत, त्याठिकाणी लोकोपयोगी कामे करावीत, निलम नगर येथे 100 बेडचे महिला प्रसुती गृह सुरु करण्याबाबत राज्य शासनास प्रस्ताव द्यावा, बंद असलेले हातपंप सुरू करावेत, उद्याने विकसीत करुन नागरिकांसाठी खुले करावीत, झोपडपट्टी भागातील गरिब मुलांसाठी अंगणवाडी सुरू कराव्यात, छत्रपती संभाजी तलाव विकसित करावा, एसआरपीएफ च्या बाजूला काही सोसायटी आहेत तेथे राहर्णाया नागरिकांसाठी वहिवाटीचा रस्ता करून द्यावा, डी मार्ट परिसरात नवीन भाजी मंडई तयार करावी, चैतन्य भाजी मार्केट सध्या बंद अवस्थेत आहे ते विकसित करून चालू करावी.

आ. देशमुख म्हणाले की, आयुक्त आणि त्यांच्या टीमने सर्व मागण्या ऐकून घेतल्या आहेत, तीन महिन्यात या पूर्ण करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. शिवाय एका महिन्यात पुन्हा एकदा आयुक्तांनी आढावा बैठक घेण्याचे सूचित केले आहे.

## 'काय घ्यायचा तो निर्णय चार आठवड्यात घ्या', जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेबाबत उच्च न्यायालयाचे आदेश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची आर्थिक स्थिती सुधारली नसल्याने गेली सहा वर्षे संचालक मंडळ निवडणूक घेण्यात आली नाही आहे. आता निवडणूक घेण्याची मागणी आहे त्यावर चार आठवड्यांत निर्णय घ्यावा, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने सहकार आयुक्तांना दिले आहेत.



सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेबाबत दाखल याचिकेवर न्यायमूर्ती ए.एस.चांदूरकर आणि न्यायमूर्ती आरिफ एस. डॉक्टर यांच्या खंडपीठाने हे आदेश दिले आहेत. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करून २९ मे २०१८ पासून याठिकाणी प्रशासक नियुक्त करण्यात आले आहे.

कलम ११० अ अन्वये प्रशासकांची नियुक्ती केली असल्यास जास्तीत-जास्त एक वर्षाचा कालावधी शक्य आहे. कलम १५७ अन्वये शासनाने वेळोवेळी प्रशासकास मुदतवाढ दिली आहे. जिल्हा मध्यवर्ती बँक संचालक मंडळाची निवडणूक घेण्याबाबत मागील तीन वर्षापासून उत्तर सोलापूर तालुक्यातील विकाससंस्था उच्च न्यायालयात याचिका दाखल करून प्रयत्न करीत आहेत.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संचालक मंडळ निवडणूक घेण्यासंदर्भात उच्च न्यायालयात वेगवेगळ्या तीन याचिका दाखल झाल्या होत्या. त्यामध्ये विकासरत्न दिलीपराव माने विकास सोसायटी, मार्डी विकास सोसायटी, कारंबा विकास सोसायटी आणि बाणेगाव विकास सोसायटीच्या याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल झाल्या होत्या.

## वैद्यकीय शिक्षण मराठीतून मिळणार; पंतप्रधानांची घोषणा

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नागपुरातील माधव नेत्रालय प्रीमियर सेंटरच्या नवीन इमारतीची पायाभरणी करण्यात आली. नागपूरच्या दौऱ्यावर असलेल्या मोदींनी या प्रसंगी विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन केले.

कार्यक्रमावेळी पंतप्रधान मोदींनी मराठीतून भाषणाला सुरुवात करत नागरिकांना गुढीपाडवा आणि नवरात्रीच्या शुभेच्छा दिल्या. तसेच, वैद्यकीय शिक्षण मराठीतून उपलब्ध करून देण्याची महत्त्वाची घोषणा केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना सोयीस्कररीत्या वैद्यकीय शिक्षण घेता यावे यासाठी मातृभाषेत वैद्यकीय शिक्षण उपलब्ध करून देण्याची घोषणा केली. यामुळे मराठी भाषिक विद्यार्थ्यांना डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार करण्याची संधी मिळेल.

मोदींनी यावेळी आरोग्य क्षेत्रातील विकासाचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, आयुष्मान भारत योजनेअंतर्गत लाखो नागरिकांना मोफत उपचार मिळत आहेत. देशभरात जवळपास एक हजार डायलिसीस सेंटर स्थापन करण्यात आली आहेत, जिथे मोफत उपचार दिले जातात. यामुळे नागरिकांचे हजारो कोटी रुपये वाचत आहेत. तसेच, एम्स संस्थांची संख्या वाढवण्यात आली असून वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या दुप्पट करण्यात आली आहे.मोदींनी यावेळी जनऔषधी केंद्रांच्या माध्यमातून गरीब आणि मध्यमवर्गीय नागरिकांना परवडणाऱ्या दरात औषधे उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे सांगितले. याशिवाय, देशभरातील डायलिसिस सेंटर मोफत सेवा देत असून त्याचा लाभ हजारो नागरिक घेत आहेत. पंतप्रधान मोदींनी नागपुरातील स्मृति मंदिराला भेट देऊन डॉ. हेडगेवार आणि गोळवलकर गुरुजी यांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०० वर्षांच्या गौरवशाली इतिहासाचा उल्लेख करत देशासाठी संघाने केलेल्या कार्याची प्रशंसा केली. मोदींनी आपल्या भाषणात नवरात्रीच्या सुरुवातीचे महत्त्व सांगितले. त्यांनी भगवान झुलेलाल आणि गुरु अंगद देव यांच्या अवतरण दिनाचे स्मरण केले तसेच डॉ. हेडगेवार यांच्या जयंतीचेही उल्लेख करत श्रद्धांजली अर्पण केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या दौऱ्यात नागपूरसाठी विविध महत्त्वाचे निर्णय घेतले गेले. आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण आणि गरीब नागरिकांसाठी विविध योजनांचा लाभ देण्यासाठी सरकार सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले.

## निर्यात शुल्क हटविल्यानंतरही कांदा दरात घसरण, क्विंटलचे दर १२५० रुपयांवर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कांद्यावरील निर्यात शुल्क हटविल्यानंतरही घाऊक बाजारात नकारात्मक वातावरण पाहण्यास मिळत असून कांदा दरात प्रति क्विंटल २५० रुपयांनी घसरण होऊन बुधवारी ते १२५० रुपयांपर्यंत आले. निर्यात शुल्क रद्द करण्यात कालापव्यय झाल्यामुळे



ही स्थिती निर्माण झाल्याचा आरोप कांदा उत्पादक शेतकरी संघटनेने केला आहे. तर रमजान ईदच्या सुट्टीमुळे परदेशातून चालू आठवड्यात मागणी नसल्याचे निर्यातदारांचे म्हणणे आहे.

मार्च अखेरीस केंद्र सरकारने कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द करण्याचा निर्णय घेतला. एक एप्रिलपासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली. परंतु, दरात सुधारणा होण्याऐवजी ते आणखी गडगडले. बुधवारी

(पान 2 वर..)

## मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदु शिबिरात 102 रुग्णांची तपासणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्री नीलकंठेश्वर सोशल फाउंडेशन चे ज्येष्ठ सल्लागार शंकर अण्णा बटगिरी यांचा वाढदिवसानिमित्त भव्य मोफत नैत्रतपासणी शिबीर आयोजित केलै होते. सदर शिबिरात 102 रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापेकी 42 रुग्णांची मोतीबिंदु शस्त्रक्रिया करण्यासाठी निवड करण्यात आली.

वरिल सर्व रुग्णांना शुक्रवार दिनांक 04/04/25 रोजी बसवैश्वर हॉस्पिटल येथे सकाळि ठाक 10.00 वाजता उपस्थित राहणे बाबत सुचना फाउंडेशन च्या वतीने देण्यात आले आहे.

सर्व रुग्णांसाठी मोफत अँम्बुलन्स ची देखील सेवा उपलब्ध करण्यात आली आहे.




**पाहिजेत**

दैनिक सोलापूर कटूसत्य — सोलापूर वृत्तदर्पण

सोलापूर वृत्तदर्पण व दैनिक कटूसत्य या माध्यमांच्या वतीने एक अभिनव व अनोखी योजना राबविण्याचा संकल्प आहे. त्यासाठी सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागात व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कायम पगारावर खालील पदे भरावयाची आहेत. या करीता सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभाग, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा या तालुका परीसरात एक प्रतिनिधी नेमणे आहेत. ही योजना यशस्वी करण्यासाठी खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | लिंग | पगार/मानधन व कमिशन (मासिक) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | व्यवस्थापक | २ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | १५००० ते २०००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| २) | सहाय्यक व्यवस्थापक | ४ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | १०००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| ३) | सह संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ४) | उप संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ५) | पत्रकार / वार्ताहर | २५ | १२ वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ६) | कॅमेरामन | २५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ७) | मार्केटींग प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ८) | जाहिरात प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ९) | प्रशिक्षण अधिकारी | १ | एम. बी.ए. / पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| १०) | वसूली प्रतिनिधी | ५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |

**नियम व अटी :-** १) इच्छूक उमेदवारांनी आपल्या स्वहस्ताक्षरात संपूर्ण माहिती असलेला अर्ज भरुन, त्या सोबत शाळेचा दाखला, मार्कलिस्ट, भारतीय असल्याचा पुरावा, दोन फोटो जोडून, खालील पत्त्यावर १५ दिवसाच्या आत आणून द्यावे. २) वयोमर्यादा १८ वर्ष पूर्ण ते ४५ वर्षापर्यंत, एक उमेदवार दोन पदासाठी अर्ज करु शकतो. ३) सर्व अधिकार वृत्तदर्पण कडे राखीव राहतील आणि ते अर्जदारांवर बंधनकारक राहतील. वृत्तदर्पण चा निर्णय अंतिम राहील. ४) सदरच्या नियुक्त्या केवळ मुलाखती घेवूनच केल्या जातील. आमच्या व आपल्या वेळेनुसार मुलाखत घेतली जाईल. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी. ५) अर्ज स्वीकारण्याची वेळ रविवार सोडून सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत. ६) मुलाखतीनंतर निवड झालेल्या सर्व उमेदवारांना मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ७) स्वतःचे वहान असणाऱ्यास प्राधान्य.

**फोन : 0217-2605091 मो.9657069069**

संपर्क :- वृत्तदर्पण कार्यालय, एफ-३, वृंदावन पार्क, चेतन फॉन्ड्रीसमोर, होटगी रोड, सोलापूर-३.

## संपादकीय

# नोटांची रद्दी

केंद्र सरकारने नोटबंदीचा जो निर्णय घेतला होता, त्याचा फटका समाजातल्या ज्या विविध घटकांना बसला त्यातला एक घटक म्हणजे महाराष्ट्रातील सहकारी बँका या होय. राज्यातल्या सुमारे आठ जिल्ह्यांतील सहकारी बँकांकडे नोटबंदीच्या काळात बंद करण्यात आलेल्या नोटांपैकी तब्बल 101 कोटी रुपयांच्या नोटा जमा झालेल्या होत्या. त्या नोटा रिझर्व्ह बँकेने या बँकांना बदलून दिलेल्या नाहीत. गेली आठ वर्षे या नोटा सहकारी बँकांकडे पडून असून त्याची आता जवळपास रद्दीच झाल्यात जमा आहे. या नोटा रिझर्व्ह बँकेने परत घ्याव्यात यासाठी सहकारी बँकांनी सातत्याने केंद्र सरकार आणि रिझर्व्ह बँकेकडे लकडा लावला आहे; परंतु या दोघांनीही त्याबाबत कानावर हात ठेवले आहेत. मध्यंतरी तर एक बातमी अशी आली होती की, सहकारी बँकांना या नोटा बदलून मिळणार नाहीत, त्यामुळे त्यांनी त्यांच्याकडे जेवढ्या नोटा आहेत तेवढा आपल्याला तोटा झाल्याचा हिशेब आपल्या ताळेबंदात नोंदवावा अशी सूचना केंद्र सरकारकडूनच या बँकांना करण्यात आली आहे. या अजब सूचनेवरून या बँकांनी कपाळावर हात मारून घेतला असावा. नोटबंदीच्या काळात केंद्र सरकारच्या लहरीपणाचे फटके अनेकांना बसले. नोटबंदीचा निर्णय जाहीर झाल्यानंतर नागरिकांकडे असलेल्या हजार रुपये आणि पाचशे रुपयांच्या नोटा बदलून घेण्यासाठी नागरिकांना एक विशिष्ट मुदत दिली गेली होती. सुरुवातीच्या काळात देशातल्या सर्व बँकांमध्ये या नोटा बदलून देण्याची सोय करण्यात आली होती.

त्यानंतर केंद्र सरकारची लहर कशी काय फिरली माहिती नाही, पण त्यांनी त्याच काळात सहकारी बँकांमधून नोटा बदलून घ्यायला बंदी घातली; परंतु तोपर्यंत ज्या नोटा सहकारी बँकेत जमा झाल्या आहेत निदान तेवढ्या नोटा तरी रिझर्व्ह बँकेने बदलून द्यायला हव्या होत्या. पण रिझर्व्ह बँकेने त्यास स्पष्ट नकार कळवला आहे. राज्यातल्या सहकारी बँकांकडे जमा झालेल्या या नोटा सर्वसामान्य नागरिकांच्या आहेत, शेतकरी तसेच गरीब कुटुंबातील लोकांच्याही आहेत आणि या सहकारी बँका राज्यातल्या नागरिकांनीच सहकारी तत्त्वावर चालवलेल्या बँका आहेत. आता या नोटा बदलून देण्यास रिझर्व्ह बँकेने नकार दिल्यामुळे या सहकारी बँकांचे आणि परिणामी राज्यातील जनतेचे तब्बल 101 कोटी रुपयांचे नुकसान होणार आहे, याची जबाबदारी कोण घेणार हा मुख्य प्रश्न आहे.

महाराष्ट्रातील कोणत्या जिल्ह्यातल्या बँकांमध्ये अशी किती रक्कम पडून आहे याकडे नजर टाकली तर लक्षात येते की, कोल्हापूर जिल्ह्यात 25.3 कोटी, पुणे जिल्ह्यात 22.2 कोटी, नाशिक जिल्ह्यात 21.3 कोटी, सांगली जिल्ह्यात 14.7 कोटी, अहिल्यानगरात 11.7 कोटी, नागपूर जिल्ह्यात पाच कोटी, वर्धा जिल्ह्यात 78 लाख आणि अमरावती जिल्ह्यात 11 लाख रुपयांच्या या नोटा आहेत. सरकारने सुरुवातीच्या काळात सहकारी बँकांना नोटा बदलून देण्यास अनुमती दिली होती; पण त्यानंतर मात्र ही अनुमती त्यांनी अचानक काढून घेतली. परंतु अनुमती असेपर्यंतच्या काळात सहकारी बँकांनी लोकांना बदलून दिलेल्या नोटा तरी रिझर्व्ह बँकेने परत घ्यायला काहीच अडचण नव्हती.

त्यासाठी नकार देण्याचे काहीच संयुक्तिक कारण नव्हते. आता या नोटांची रद्दी झाल्यामुळे जे नुकसान झाले आहे ते कोण सोसणार. 101 कोटी रुपये ही काही थोडी रक्कम नव्हे. या प्रकरणाच्या मूळ तपशिलाकडे नीट लक्ष दिल्यानंतर लक्षात येते की, देशातील काळ्या पैशावर सर्जिकल स्ट्राइक म्हणून केंद्र सरकारने नोटबंदीचा हा निर्णय घेतला होता. हजार आणि पाचशे रुपयांच्या नोटा रद्द केल्यानंतर हिशेबातल्या नोटा म्हणजेच व्हाइट मनीच्या स्वरूपातल्या आहेत तेवढ्याच नोटा परत येतील आणि जो पैसा काळ्या पैशाच्या स्वरूपात आहे त्या नोटा बँकेत जमा होणार नाहीत अशी केंद्र सरकारची अटकळ होती. पण सरकारची ही अटकळ फसली आणि हजार आणि पाचशे रुपयांच्या जेवढ्या नोटा चलनात होत्या तेवढ्या सगळ्याच्या सगळ्या नोटा परत येण्याची शक्यता निर्माण झाल्यानंतर केंद्र सरकारचे धाबे दणाणले आणि त्यांनी पटापट निर्णय घेऊन या नोटा बदलून देण्याचाच मार्ग बंद केला. नागरिकांनासुद्धा नोटा बदलून घेण्यासाठी जेवढी मुदत दिली होती, ती मुदतही त्यांनी खूप आधीच बंद केली. त्यावेळीही नागरिकांनी खूप आरडाओरड केली होती. बंदी घालण्यात आलेल्या हजार आणि पाचशे रुपयांच्या नोटांपैकी जवळपास 99 टक्के नोटा बँकांमध्ये परत आल्या किंवा त्या नागरिकांनी बदलून घेतल्या, वास्तविक नोटा बदलून घेण्याची मुदत कमी केली नसती, तर त्या अवधीत जवळपास शंभर टक्के नोटा परत आल्या असत्या आणि सरकारची नाचक्की झाली असती म्हणून सरकारने जे अघोरी उपाय योजले त्यातलाच आणखी एक अघोरी प्रकार म्हणजे सहकारी बँकांकडे जमा झालेल्या नोटा बदलून देण्यास नकार देणे हा होता, हे त्याचवेळी लक्षात आले आहे.

तथापि, आता सरकारने किंवा रिझर्व्ह बँकेने हा मुद्दा फार प्रतिष्ठेचा न करता सहकारी बँकांकडे जमा झालेल्या या नोटा त्वरित बदलून द्याव्यात आणि या बँकांचे नुकसान टाळावे अशी सूचना या निमित्ताने करावीशी वाटते. आता या बँकांनी सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले आहे. तिथे यावर तातडीने निर्णय होणे अपेक्षित आहे. सर्वोच्च न्यायालयाकडून या बँकांना तिथे नक्की दाद मिळू शकेल; पण तेथील सुनावणीत केंद्र सरकारच्या वकिलानेही विधायक भूमिका घ्यावी, अशीसुद्धा अपेक्षा आहे.

# राजकीय पुढाऱ्यांनो आपली पोळी शेकण्यासाठी इतिहासाचा गैरवापर करू नका

ही बाब सत्य आहे की औरंगजेब क्रूर होता.कारण त्यांनी आपल्या बादशाहीसाठी आपला संपूर्ण परिवार संपविला आणि छत्रपती संभाजी महाराजांची अमानुषपणे यातना देऊन हत्या केली हेही सत्य आहे.आकाश-पाताळ एक केले तरी संभाजी महाराज कोणाच्याही हाती लागणारा योध्दा नव्हता. कारण तो छावा होता.आपल्याच माणसांनी फितूरी करून संभाजी महाराजांना औरंगजेबाच्या ताब्यात देऊन मोठा घात झाला.यदाकदाचित असे जर झाले नसते तर छत्रपती संभाजी महाराजांनी संपूर्ण मोगलशाही क्षणातच संपुष्टात आणली असती हेही तितकेच सत्य आहे.परंतु फितूरीने संभाजी महाराजांचा घात झाला व औरंगजेबाने त्यांना कैद केले व अनंत यातना देऊन त्यांची हत्या केली.याचे दुःख आजही महाराष्ट्रासह संपूर्ण भारतवासीयांना होते व आहे.त्याचप्रमाणे आजही या घटनेने संपूर्ण जनतेचा खुन खवळतो.परंतु राजकीय पुढाऱ्यांचा नाही कारण ते स्वाथापीटी वेगवेगळे नवीन-नवीन मुद्दे निर्माण करून धर्मा-धर्मामध्ये व्देष पसरविण्याचे काम करतात हा त्यांचा धंदा होऊन बसला आहे. भारतात इंग्रजांनी १५० वर्षे राज्य केले.या दिडशे वर्षांत इंग्रजांनी लाखोंच्या संख्येने निरअपराधांचा बळी घेतला.गुन्हा नसतांनाही अनेकांना मृत्यूच्या खाईत लोटले.अशा भयावह परिस्थितीला सुध्दा राजकीय पुढाऱ्यांनी विसरून चालणार नाही हेही लक्षात ठेवले पाहिजे. १३ एप्रिल १९१९ रोजी अनेक कुटुंबे जालियनवाला बागेत शांतता निषेधासाठी जमली होती. मात्र ब्रिटिश सैन्याच्या नेतृत्वाखालील जनरल डायरने आपल्या सैनिकांना गोळीबार करण्याचा आदेश दिला आणि पूर्ण दारूगोळा संपेपर्यंत हा नरसंहार सुरूच राहिला.या घटनेत १५०० हून अधिक लोक मृत्युमुखी पडले,तर १२०० हून अधिक लोक गंभीर जखमी झाले होते.या घटनेने देशात सर्वत्र शोककळा पसरली व अंधक्कार निर्माण झाला.मग आपण आता इंग्रजांनी बांधलेल्या इमारती किंवा स्मारके तोडणार का? असाही प्रश्न उपस्थित होतो! त्यामुळे इतिहास घडला तो घडला त्यांच्याशी छेडछाड किंवा गैरवापर करून काहीतरी विवादास्पद वक्तव्य देवून आपसात झगडे लावण्याला काहीही अर्थ नाही असे मला वाटते. औरंगजेबाने भारतावर ४९ वर्षे (१६५८-१७०७) राज्य केले.याच्या तुलनेत इंग्रजांनी १५० वर्षे राज्य केले. क्रूरता दोघांमध्येही होती या दोघांनी आपल्या संपूर्ण हद्दी पार करून भारतावर राज्य केले. त्यामुळे हा इतिहास आहे याला जर राजकीय पुढारी आपापल्या पद्धतीने हाताळीत असेल तर देशात विद्धा निर्माण होवून आपसात किंवा धर्मा-धर्मात वैरत्व वाढु शकते.त्यामुळे कोणत्याही इतिहासाबद्दल बोलायचे असेल तर जाणीवपूर्वक व अभ्यास करूनच बोलले पाहिजे. देशात ज्याही काही ऐतिहासिक वास्तु आहेत त्या सांभाळण्याचा दायित्व इतिहासकार व भारतीय पुरातत्व विभाग (ए.एस.आय.) यांच्याकडे आहे करीता यात कोणतीही राजकीय ढवळाढवळ किंवा वक्तव्येबाजी नको. येणाऱ्या पिढीला पुर्वी काय घडले याचाही इतिहास माहीत असायला हवा. आपण औरंगजेबाची कबर जर हटविली तर कोणाला माहीत होणार की तो क्रूर शासक होता किंवा मराठ्यांनी त्याला इथेच संपविले. नवीन पिढीला देशाचाच नाही तर संपूर्ण जगाचा इतिहास माहीत व्हायला पाहिजे.त्यामुळे कबर हटवुन इतिहासाशी छेडछाड करता येणार नाही.सध्या ब्रिटिशमध्ये संसदीय अधिवेशन सुरू आहे यावेळेस संसदेत जालियनवाला बाग हत्याकांडाचे पडसाद उमटतांना दिसले. ब्रिटिश संसदेत तेथीलच खासदार बॉब ब्लॅकमॅन यांनी जालियनवाला बाग हत्याकांडासाठी ब्रिटनने भारताची औपचारिक माफी मागावी अशी मागणी केली.या मागणीवरून ब्रिटनच्या संसदेत मोठा गदारोळ झाला.दिनांक १३ एप्रिल १९१९ मध्ये पंजाबमधील जालियनवाला बाग येथे हे भयावह हत्याकांड घडले होते.बॉब ब्लॅकमॅन यांनी या घटनेचा उल्लेख ब्रिटिशांच्या वसाहत काळाच्या इतिहासातील लाजिरवाणा काळा डाग असे संबोधित केले आहे.या हत्याकांडाच्या पार्श्वभूमीवर ब्रिटिश सरकारने या अमानवीय कृत्याची जबाबदारी स्वीकारून औपचारिक माफी मागण्याचे आव्हान ब्लॅकमॅन यांनी संसदेत केले याचे स्वागतच.परंतु आता भारत सरकार या हत्याकांडाबदल माफी मागण्यास ब्रिटिश सरकारवर दबाव टाकणार काय असा प्रश्न उपस्थित होतो. त्यामुळे हे लक्षात ठेवले पाहिजे की ज्या प्रमाणे औरंगजेब क्रूर होता त्याच्या पेक्षा जास्त इंग्रजही क्रूर होते ही बाब जालियनवाला बाग हत्याकांडावरून सर्वांना लक्षात येते. त्यामुळे सध्या देशात जातीधर्माचे जे काही राजकारण सुरू आहे ते फक्त राजकीय पोळी शेकण्यासाठी इतिहासाचा गैर वापर करीत असल्याचे स्पष्ट दिसून येते.देशात अनेक मोठमोठ्या समस्या आहेत बेरोजगारी, पाण्याची समस्या, कुपोषण, शैक्षणिक समस्या, महागाई, प्रदुषण, नैसर्गिक महाप्रलय, शेतकऱ्यांच्या समस्या इत्यादी अनेक महत्त्वपूर्ण समस्या आहेत. परंतु त्याबाबतीत लोकांची दिशाभूल (डायव्हरशन) करण्याच्या उद्देशाने राजकीय पुढारी इतिहासाचा गैर वापर करून प्रक्षोभक वक्तव्य देत असल्याचे दिसून येते.राज्यासह देशातील राजकीय पुढाऱ्यांनी महापुरुष, थोर महात्मे, महान योध्दा किंवा इतिहास यांचा पुर्ण अभ्यास करूनच वक्तव्य केले पाहिजे जेणेकरून कोणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाही किंवा चुकीचा संदेश जाणार नाही याची काळजी मुख्यत्वे करून राजकीय पुढाऱ्यांनी घेतली पाहिजे.कारण एका चुकीच्या वक्तव्याने किंवा प्रक्षोभक भाषणाने लोकांमध्ये व्दिधा निर्माण होते व याचे वाईट पडसाद उमटतांना दिसतात हे आपणा सर्वांनाच ग्यात आहे.याची जाण राजकीय पुढाऱ्यांनी ठेवली पाहिजे.जगाच्या पाठीवरील भारत असा एकमेव देश आहे की याठिकाणी सर्वच धर्माचे, जाती पंथाचे लोक एकोप्याने राहतात व विभिन्न संस्कृती या भुमित दिसून येते. त्यामुळे जगात भारताची ओळख सुद्धा आगळीवेगळी आहे. त्यामुळे जगातील अनेक लोक भारतात इतिहासाचा, संस्कृतीचा व विविधतेचा अभ्यास करण्यासाठी येतात.त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांची विरगाथा जगाच्या कानाकोपऱ्यात गेली पाहिजे यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत.मी महामहीम राष्ट्रपती,प्रधानमंत्री, उपराष्ट्रपती, सुप्रीम कोर्ट व लोकसभा अध्यक्ष यांना विनंती करतो की राजकीय पुढारी इतिहासाचा गैर वापर करून प्रक्षोभक किंवा लोकांचे मन दुखावणारे वक्तव्य करीत असेल व समाजात जहर पसरविण्याचे काम करीत असेल अशांवर कठोर कारवाई करावी. जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

## प्रबोधन

# साहस : दुःसाहस
# साहसी माणसा । मिळे धन, कीर्ती

योननागोची हे एक विदेशी विचारवंत. ते म्हणतात, साहसी मनुष्य शत्रू किती आहेत हे शोधत नाही; तर तो शत्रू कोठे आहे, याचा शोध घेतो.' छत्रपती शिवरायांचं जीवन ही तर साहसाची एक मालिकाच होती. त्यांच्या आगेमागे होऊन गेलेल्या थोर व्यक्तींना हातात शस्त्र आणि मनात तुफानी साहस, यांच्या आधारेच आपलं श्रेष्ठत्व सिद्ध करावं लागलं. आधी लगीन कोंढाण्याचं, मग रायबाचं! म्हणून सिंहगड जिंकता जिंकता हौतात्म्य पत्करणारे तानाजी मालुसरे आणि विशाळगडावरून तोफांचे आवाज ऐकू येईपर्यंत शिवरायांसाठी शरीरातील रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत पावनखिंड लढवणारे बाजीप्रभू देशपांडे हेही असेच साहसी होते. शस्त्राधारित साहसाची ही परंपरा सुभाषचंद्र बोसांपर्यंत चालू होती. पण महात्मा गांधीजींनी निःशस्त्र प्रतिकार, सत्याग्रह, आत्मपीडा या मानवोचित संस्कारांत साहस ओतून मानवतेच्या इतिहासात अभूतपूर्व विजय मिळवला.

स्वातंत्र्याची चळवळ चालवायची तर पैसा हवा. क्रांतिसिंह नाना पाटील आणि त्यांच्यासारख्या अन्य साहसी देशभक्तांनी इंग्रजांचे खजिने लुटण्याची मोहीम सुरू केली. अंकलखोपच्या म्हसोबाचे डोळेही नाना पाटलांनी काढून नेले. देश हा देव असे माझा, हाच विचार त्या क्रांतिवीरांच्या मनात जागत होता. देश आधी, देव-धर्म त्यापुढे तुच्छ ही धारणा परिवर्तनकारी होती. देशभक्त रत्नापा कुंभार, दत्तोबा तांबट या बहाद्दरांनी तर सरळ जेजुरीच्या खंडोबा देवस्थानावर हल्ला केला. देवांचे मुखवटे आणून ते वितळवले. त्या सोन्याच्या पैशातून चळवळीला बळ आलं. पुरातन भारताच्या सनातन विचारातून या देशभक्तांना मुक्त करणारं देशप्रेम त्यांच्या मनातील साहसातूनच जन्मलं होतं. आज आपण जे स्वातंत्र्य भोगतो ते त्या शूरांच्या बुद्धिप्रामाण्यवादी साहसातून आलं आहे. आज देशात उद्योगपती साहसं करतात ती, जागतिक दृष्टिकोनातून थोरच असतात. आपली तंत्रज्ञ मंडळी परदेशात जातात, तीही साहसकृत्यंच आहेत. भारताच्या पाणी, कुपोषण, प्रदूषण, दारिद्र्य, अंधश्रद्धा, लोकसंख्यावाढ, अज्ञान, व्यसनाधीनता, आर्थिक गैरव्यवहार, मागासलेपण, यांच्याशी दोन हात करण्यासाठी जे प्रयत्नशील आहेत, ते सारे साहसीच आहेत. धार्मिक भावनांचं भांडवल करून जे देशाला वैर आणि सुडाच्या आगीत ढकलतात, त्यांचं पितळ उघडं पाडून जनमानसाला योग्य वळण लावणारे विचारी लोक साहसीच असतात.

शोधांच्या क्षेत्रात होमिओपॅथीचे जनक सॅम्युअल हनिमान यांचं कार्य तर लोकोत्तर होतं. अनेक औषधांची चाचणी स्वतःच्या शरीरावर करून घेणारा हा महापुरुष, शोधकांना एक आदर्श बहाल करून गेला. श्रीलंकेचे डॉ. अब्राहम कोवूर यांना अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचं जनक म्हटलं जातं. भुतांचं भय काल्पनिक असतं, हे सिद्ध करण्यासाठी ते अमावस्येच्या रात्री कॅमेरा, टेपरेकॉर्डर घेऊन स्मशानात रात्रभर ठाण मांडून बसले होते. सकाळी त्यांनी भूत दाखवा आणि एक लाख रुपये मिळवा अशी घोषणा केली. त्यांचं साहस लोकोद्धारक होतं.

प्रा. श्री.म. माटे यांनी या पोराला आता तूच सांभाळ अशी एक व्यक्तिचित्रणात्मक कथा लिहिली आहे. कथानायक नरहरी हा अनेक साहसं करायचा. त्यातील काही लोकोपयोगी होती; तर बरीच फालतूही होती. अगदी नरहरीचे नातेवाईक शोभतील असे अनेक साहसवीर चरिताथार्ची काळजी नसलेल्या युरोप-अमेरिकेत आढळतात. ग्लायडिंग, स्केटिंग, मांऊंटेनियरिंग, ट्रेकिंग, क्रॉसकंट्री, मोटररेस यात जिवाची काळजी न करता धडपडणारी माणसं पैसा आणि वेळ यांचा प्रचंड अपव्यय करीत आहेत. जगाच्या दुःखाचं निराकरण करण्याचा प्रयत्न अंशतःही न करणं, हा माणुसकीचा अपमानच आहे. श्री.म. माटे यांचा नरहरी मात्र आपलं साहस दुसऱ्याला वाचवण्याच्या कामी उपयोगी पडलं नाही, म्हणून हाय खातो. त्याला मानसिक धक्का बसतो. साहसाला अशी दृष्टी असेल, तर उद्याचं जग दुःखी असणार नाही. माणुसकीची परिमाणं नसलेली साहसं हेच जगावरचं खरं संकट असतं.

साहस हे नाव आहे जगण्याचे
नाही कळायाचे । शेंदाडांना ॥ १
साहसी माणसा । मिळे धन, कीर्ती
सुखा ये भरती । साहसाने ॥ २
समाजघातकी । नव्हे ते साहस
तो तरी त्रास घातकारी ॥ ३
क्रूर कृत्या नको म्हणाया साहस
दरोडेखोरास । नका वाणू ॥४
शोध-संशोधनी । साहस असावे
जगा उद्धारावे । शोधकांनी ॥५
जीव वाचवावा। धोका पत्करून
साहस त्याहून । अन्य नाही ॥ ६
मानवतावादी । करितो साहस
वृंदावे तयास। जीवेभावे ॥७



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# सोलापूर शहर हद्दीतील बॅंकाचे शाखाधारक, कंपन्या, मॉल्स, शोरूमसाठी आता सुपर टॅक्स माफ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापालिका प्रशासनाने सुपरटॅक्स रद्द करत शहरातील साधारण २० हजार व्यावसायिकांना दिलासा दिला आहे. व्यावसायिकांना भरावा लागणारा सुपरटॅक्स ११३ टक्क्यांवरून आता सरसकट ६४ टक्क्यांवर आला आहे.त्यामुळे सेकंड ॲग्रिमेंटमधून शोधली जाणारी पळवाट बंद होऊन व्यवहारामध्ये पारदर्शीपणा येणार आहे. महापालिकेच्या उत्पन्न वाढीस देखील मदत होणार आहे.

शहरातील उद्योग विकासाला पाठबळ देण्यासाठी सुपरटॅक्स ११३ टक्क्यांऐवजी ६४ टक्के करावा, असा प्रस्ताव कर संकलन व आकारणी विभागाने सादर केला होता. त्यावर महापालिकेच्या उपसमितीमध्ये या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. त्यानुसार ठराव करण्यात आला. या ठरावानुसार १ एप्रिल २०२५ पासून सुपरटॅक्स रद्दची अंमलबजावणी सुरू झाली आहे. एखाद्या जमीन मालकाला व्यवसाय करण्यासाठी आकारला जाणारा कर अथवा व्यवसायासाठी दुसऱ्यांना जागा भाडेतत्वावर दिल्यानंतर एकूण वार्षिक भाडेमूल्यावर आकारला जाणारा कर म्हणजे सुपरटॅक्स होय. शहरातील सर्वच व्यावसायिक व उद्योजकांनी प्रशासनाकडे मूलभूत सुविधांसह सुपरटॅक्स कमी करण्याबाबत वारंवार पाठपुरावा केला आहे.

सुरपटॅक्सचा आर्थिक बोजा सहन न झाल्याने अनेक उद्योजकांनी सोलापूरकडे पाठ फिरविली तर काही उद्योजकांनी सेकंड ॲग्रिमेंटच्या माध्यमातून पळवाट शोधली. यामध्ये महापालिका प्रशासन व उद्योजक दोघांनाही आर्थिक फटका बसत होता. शहरातील उद्योग व्यवसायाला चालना देण्यासाठी सुपरटॅक्सवर नियंत्रण आणण्याची बाब अधोरेखित झाल्यानंतर अखेर अनेक वर्षापासून प्रलंबित विषय मार्गी लावत प्रशासनाने व्यावसायिकांना दिलासा देणारा निर्णय घेतला आहे.

### असा होता सुपरटॅक्स

घरमालक त्याच्या जागेवर व्यवसाय करणार असल्यास त्या जागेवरील महापालिकेच्या एकूण करपात्र मूल्यानुसार वार्षिक भाडे निश्चित केले जाते. त्यातून दहा टक्के घसारा कमी करून उर्वरित ९० टक्के करपात्र मूल्यातील ६४ टक्क्यांप्रमाणे येणारी रक्कम कर म्हणून मालकाला भरावी लागत असे. जर ती जागा भाडेतत्वावर दिल्यास त्यांना ६४ टक्के आणि पुन्हा नोकर शाश्वती कर (तीन टक्के) व शिक्षण कर (१२ टक्के) वगळून उर्वरित ४९ टक्क्यांप्रमाणे येणारी रक्कम अशी एकूण ११३ टक्क्यांप्रमाणे येणारी रक्कम भाडेकरूला सुपर टॅक्स म्हणून भरावी लागत होती. भाडेकरूंना आकारल्या जाणाऱ्या ११३ टक्के सुपरटॅक्सऐवजी जमीन मालक आणि भाडेकरू यांना सरसकट ६४ टक्क्यांप्रमाणे कर आकारणी होणार आहे.

शहरातील विविध बँकाचे शाखाधारक, विविध कंपन्या, मॉल्स, शोरूम यांच्यासाठी सुपर टॅक्स आकारला जात होता. या व्यावसायिकांना आता सुपरटॅक्समधून मुक्ती मिळाली आहे. दरम्यान, शहरातील अनेक मालमत्ताधारकांनी मल्टिनॅशनल कंपन्यांना आपल्या जागा भाड्याने दिल्या आहेत. सुपरटॅक्सच्या कक्षेत येणारे साधारण १९ ते २० हजार व्यावसायिक आहेत. मात्र प्रत्यक्ष महापालिकेकडे केवळ ५५० जणांनीच नोंद केली आहे.

# झेडपीसह अनुदानित शाळांमधील ७0000 शिक्षकांची पदे घटली

## पवित्र पोर्टलवर अवघ्या ११००० पदांच्याच जाहिराती, त्यात झेडपीचे अन 'खासगी'चे शिक्षक किती?

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठी माध्यमांच्या शाळांमधील पटसंख्या दिवसेंदिवस कमी झाल्याने १५ वर्षांत राज्यातील २२ हजार खासगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांमधील तब्बल ५२ हजार शिक्षक-शिक्षकेतरची पदे कमी झाल्याची वस्तुस्थिती समोर आली आहे. दुसरीकडे जिल्हा परिषदांच्या ६२ हजार शाळांमधील देखील अंदाजे १८ हजार शिक्षकांची पदे कमी झाली आहेत.

राज्यातील जिल्हा परिषदांच्या ६२ हजार शाळांमध्ये सध्या एक कोटी ७० लाखांपर्यंत विद्यार्थी प्रवेशित आहेत. दुसरीकडे खासगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक शाळांसह कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या २२ हजारापर्यंत आहे. पालकांचा कल इंग्रजी माध्यमांकडे वाढला असून दरवर्षी राज्यात सुमारे २०० खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांची भर पडत आहे. महागाईमुळे खर्च पेलवत नाही व अन्य कारणांमुळे जन्मदरातही घट झाली आहे. दुसरीकडे तरुण-तरुणींच्या विवाहाचे वय देखील वाढत असून सरासरी ३० च्या वयोगटात विवाह होत आहेत. एकुलता एक मुलगा चांगला शिकावा म्हणून पालक मराठी माध्यमाच्या अनुदानित शाळांऐवजी खासगी इंग्रजी माध्यमाच्या शाळेतच त्याचा प्रवेश घेत आहेत. त्यामुळे आता १० ते २० पर्यंत पटसंख्या असलेल्या जिल्हा परिषदांच्या शाळांची संख्या सहा हजारांवर गेली आहे. त्यामुळे अनुदानित व जिल्हा परिषदांच्या शाळांमधील शिक्षकांची मंजूर पदे कमी होत असल्याचे निरीक्षण शालेय शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नोंदविले आहे.

पान १ वरून

# निर्यात शुल्क हटविल्यानंतरही...

लासलगाव बाजार समितीत सुमारे १२ हजार क्विंटलची आवक झाली. त्यास सरासरी १२५० रुपये भाव मिळाला. २७ मार्च रोजी हे दर दीड हजार रुपये होते. निर्यात शुल्क रद्द करण्यासाठी केंद्र सरकारने दिरंगाई केल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. २२ मार्चला घेतलेल्या निर्णयाची एक एप्रिलला अंमलबजावणी केली गेली, याकडे कांदा उत्पादक शेतकरी संघटनेने लक्ष वेधले.

आखाती देश, मलेशिया, इंडोनेशिया ही भारतीय कांद्याची प्रमुख बाजारपेठ आहे. या देशांमध्ये रमजान ईदची साप्ताहिक सुट्टी असल्याने सध्या भारतीय कांद्यास लगेचच मागणी नाही. पाकिस्तानकडून बहुतांश भागात कांदा निर्यात केला जातो. ती बाजारपेठ हळूहळू ताब्यात येण्यासाठी काही दिवसांचा अवधी लागेल. एप्रिलपर्यंत भारतीय कांद्याला मागणी येण्याची शक्यता आहे.

**- विकास सिंग**
(निर्यातदार)

जास्तीत जास्त कांदा निर्यात होण्यासाठी केंद्र सरकारने आता नियार्तीवर अनुदान आणि दरात सुधारणा होण्यासाठी तत्काळ उपाययोजना कराव्यात अन्यथा संघटनेकडून राज्यभर तीव्र आंदोलन केले जाईल.

**- भारत दिघोळे** (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटना)

# जग बदलणारा बापमाणूस 'पुस्तकाला' नेल्सन मंडेला पुरस्कार' नागपूरात आर्यवृत्त विद्यापीठ त्रिपुराचे कुलगुरू डॉ.प्रकाश करमाडकर यांच्या हस्ते लेखक ओहोळ यांचा झाला सन्मान

**करमाळा,(कटूसत्य वृत्त):-** करमाळा तालुक्यातील युवा लेखक जगदीश ओहोळ यांनी लिहिलेले 'जग बदलणारा बापमाणूस' या ग्रंथास 'जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळा'च्या वतीने 'नेल्सन मंडेला पुरस्कार' प्रदान करण्यात आला. आर्यवृत्त आंतरराष्ट्रीय विद्यापीठ त्रिपुराचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश करमाडकर यांच्या हस्ते लेखक जगदीश ओहोळ यांना सन्मान मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन नागपुरात गौरविण्यात आले.



'जग बदलणारा बापमाणूस' हे "नव्या पिढीला, नव्या भाषेत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगणारे मोटिवेशनल पुस्तक आहे." अगदी कमी कालावधीमध्ये अधिकाधिक प्रतींची विक्री होऊन या पुस्तकाने मराठी साहित्य विश्वात नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. विशेष म्हणजे या पुस्तकाच्या दहाव्या वृत्तीचे प्रकाशन अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात झाले आहे. कोलंबिया विद्यापीठात प्रकाशित होणारे 'जग बदलणारा बापमाणूस' हे पहिले मराठी पुस्तक ठरले आहे.

यावेळी महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळाचे सदस्य डॉ. राजेश गायकवाड, जागतिक आंबेडकरवादी महामंडळाचे अध्यक्ष डॉ. दीपककुमार खोब्रागडे, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. जगन कराडे,साहित्यिक डॉ. विद्याधर बन्सोड यांच्यासह अनेक मान्यवर, वाचक, श्रोते मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

## वात्रटिका

### पुन्हा पुन्हा दम

उठसूठ त्याच गोष्टीचा
कितीदा होतो बोलबाला...
मराठी पाट्या असाव्यात
यासाठी तो पुन्हा धावला...
गरम मामला तोवर ठीक
पुन्हा विसरून जाता...
पुन्हा तीच आरोळी होते
आठवण निमित्ताने येता...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# मृणाली खाडे एन.एम.एम.एस परिक्षेत जिल्ह्यात पाचवी तर अद्विक बनपट्टे याने अभिरुप परिक्षेत सातवी



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संचलित श्री जयसिंह मोहिते पाटील विद्यालय संग्रामनगर शाळेतील विद्यार्थ्यांनी शालाबाह्य स्पर्धा परिक्षेत घवघवीत यश संपादन केले.

इयत्ता आठवीतील विद्यार्थ्यीनी मृणाली बीटाजी खाडे हिने एन. एम. एम. एस. शिष्यवृत्ती परिक्षेत १८० पैकी ८४ गुण मिळवून एन.टी-ड प्रवगार्तून जिल्हा गुणवत्ता यादीत पाचव्या तर माळशिरस तालुका गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक मिळवला आहे तसेच चिरंतन रवींद्र भोके याने १८० पैकी ७६ गुण मिळवून ही परिक्षा उत्तीर्ण झाला. तसेच प्राथमिक विभागातील इयत्ता चौथीतील विद्यार्थी अद्विक अमोल बनपट्टे याने अभिरुप शिष्यवृत्ती परिक्षा २०२४-२५ मध्ये सोलापूर जिल्हा गुणवत्ता यादीत सातवा क्रमांक पटकावला तर मंथन शिष्यवृत्ती परिक्षेत ३००पैकी २७४ गुण मिळवून ९१.९५ % सह "ए" श्रेणी मिळवली त्याबद्दल प्रशालेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच त्यांना मार्गदर्शन करणार्या सहशिक्षिका विजया पेटकर आणि महेश शिंदे यांचे अभिनंदन करण्यात आले. याप्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक मल्हारी घुले सर, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक गणेश करडे सर,पालक बीटाजी खाडे आणि सर्व शिक्षक शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

प्रशालेतील विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संस्थेचे मार्गदर्शक संचालक जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह जयसिंह मोहिते पाटील, संचालिका स्वरूपाराणी जयसिंह मोहिते पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे, सभापती निशा गिरमे, प्रशाला समिती सदस्य महादेव अंधारे, यशवंत साळुंखे यांनी अभिनंदन केले.

# अन्नछत्र न्यास हे धार्मिक संस्कृतीचा अक्षय वटवृक्ष - ना. जयकुमार गोरे



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र न्यास हे धार्मिक संस्कृतीचा अक्षय वटवृक्ष असल्याचे मनोगत सोलापूर जिल्ह्याचे पालक मंत्री व राज्याचे ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे यांनी व्यक्त केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे सहपरिवार आले असता न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते. त्यांच्या समवेत सुविद्य पत्नी सोनिया जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष अमोलबापू शिंदे, भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य शहाजी पवार, आनंदराव तानवडे, शिवशरण जोजन, वहिदपाशा शेख, महेश हिंडोळे, मल्लिनाथ स्वामी, शिवराज स्वामी, ननु कोरबू, बसवंतराव कलशेट्टी, लखन झंपले, संतोष पाटील, आ.सचिन कल्याणशेट्टी यांचे स्वीय सहायक धनंजय गाढवे उपस्थित होते.

पुढे बोलताना ना.जयकुमार गोरे म्हणाले, अन्नछत्र मंडळ रुपी वटवृक्ष समाजाला उजार्वान बनवित आहे. श्रद्धा, संस्कार आणि समाजसेवेचा दीपस्तंभ असून, धार्मिकतेबरोबरच सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा या विविध क्षेत्रातील कायार्ने राज्यातच नव्हे तर देशभरात, परदेशात अन्नछत्र मंडळाचे नांव पोहचेल आहे. तालुक्यातील ७७ कुस्तीगीरांना दरमहा वजन गटानुसार देण्यात येणारा प्रसादरुपी खुराक या योजनेसह दिव्यांग, निराधार यांना समर्थ महाप्रसाद सेवा दिली जाते ही बाब राज्यातील अन्य धर्मादाय संस्था पहायला मिळत नाही, मात्र गरजा ओळखून भोसले पिता- पुत्राकडून अन्नछत्र मंडळाच्या माध्यमातून भक्त सेवेतून समाजसेवा घडत असल्याचे ना. गोरे यांनी सांगून एकाच क्षताखाली अन्नछत्र प्रगतीचे पाउल टाकत आहे. राज्यातील अन्य धर्माधाय संस्थाना अन्नछत्राचे कार्य अनुकरणीय असल्याचे ना. जयकुमार गोरे म्हणाले.

यावेळी न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, सनी सोनटक्के, वैभव मोरे, निखील पाटील, अतिश पवार, प्रवीण घाडगे, गोटू माने, विशाल कलबुर्गी, भरत राजेगावकर, सुमित कल्याणी, विनायक भोसले, सुरज सावंत, सतीश महिंद्रकर, शहाजी यादव, स्वामिनाथ बाबर, बाळासाहेब घाडगे, नामा भोसले, संभाजीराव पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, महेश भोसले, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस के स्वामी, महांतेश स्वामी, सिद्धाराम कल्याणी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, महादेव अनगले, अनिल गवळी, धानप्पा उमदी, कल्याण देशमुख, धनंजय निंबाळकर, विशाल घाडगे, रोहित कदम, खंडेराया होटकर, मल्लिकार्जुन गवळी, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# उन्हाळ्यात वाड्या वस्त्यांपर्यंत पाणी पोहचवा; आ. अवताडे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना





**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर तालुक्यातील नागरिकांना उन्हाळ्यात पाणी टंचाईचा सामना करावा लागू नये यासाठी पंढरपूर पंचायत समिती सभागृहात आ. समाधान आवताडे यांनी बुधवारी पंढरपूर तालुक्यातील सरपंच, ग्रामसेवक व सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन पाणी टंचाई आढावा बैठक घेतला.

याप्रसंगी उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, नायब तहसीलदार बालाजी पूदलवाड यांच्यासह सर्व विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

या आढावा बैठकीत अनेक सरपंच व सदस्यांनी पाणी टंचाईदूर करण्यासाठी गावागावातील ओढे, नाले, तलाव भरून घ्यावेत. पाणी मिळत नसूनही कर आकारणी केली जाते अशा तक्रारींचा पाढा लोकप्रतिनिधीसमोर वाचला.

नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये यासाठी आमदार समाधान आवताडे यांनी गावागावातील वडे, नाले, तलाव भरून घ्यावेत. हातपंप सुरू करून वाड्या वस्त्यांपर्यंत पाणी पोहोचवा अशा सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी घरकुल योजना यासह विविध विभागाचा आढावा घेतला. या आढावा बैठकीमुळे योग्य पाण्याचे नियोजन होणार असून नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

# निमगाव येथील मैदानात चटकदार निकाली कुस्त्या



**निमगाव : (कटुसत्य वृत्त):-** निमगाव म. (ता. माळशिरस) येथे स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त कुस्तींचे मैदान माळशिरस तालुका राष्ट्रवादी युवकचे उपाध्यक्ष प्रताप मगर यांनी कुस्ती मैदानाचे आयोजन केले होते. या मैदानाचे उद्घाटन संग्रामसिंह सेवा संस्थेचे चेअरमन विलास मगर यांच्या हस्ते करण्यात आले.

या कुस्ती मैदानात सोलापूर, सांगली, सातारा, धाराशिव व अन्य जिल्ह्यातून छोट्या व नामांकित मल्लांनी निकाली कुस्त्या केल्याने कुस्ती शौकिनांच्या डोळ्याचे पारणे फिटले. या कुस्ती मैदानात खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार उत्तमराव जानकर, मल्लसम्राट रावसाहेब मगर, सरपंच सुभाष साठे हे प्रमुख उपस्थित होते. सर्व वस्ताद व प्रमुख पाहुण्यांचा सन्मान प्रताप मगर, सतीश मगर यांनी केला. कुस्ती मैदान यशस्वी करण्यासाठी सतीश मगर, किरण मगर, प्रकाश मगर यांनी परिश्रम घेतले.

# आदिवासी लाभार्थ्यांकरीता कर्ज योजना

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मार्फत एन.एस.टी एफ. डी.सी. नवी दिल्ली तथा राज्यशासन पुरस्कृत कर्ज योजना राबविण्यात येत आहेत. शबरी शाखा कार्यालय, जुन्नर कार्यक्षेत्रात येणारे पुणे, अहिल्यानगर, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, धाराशिव बीड, लातुर या जिल्ह्यातील आदिवासी लाभार्थ्यांकरीता कर्ज योजना राबविण्यासाठी खालील तपशिलाप्रमाणे सन 2024-25 साठी योजना निहाय लक्षांक प्राप्त झालेले आहेत. शाखा कार्यालयाचे नांव- जुन्नर - योजनेचा तपशिल - राज्यशासन पुरस्कृत योजना -स्वयंसहायता बचत गट (रु.5 लक्ष)- 04, ऑटो वर्कशॉप/स्पेअर पार्ट (रु.5 लक्ष)- 04 लहान उद्योग व्यवसाय (रू.2 लक्ष) -0 - ऑटो रिक्षा / मालवाहतुक रिक्षा (रू. 3लक्ष) - 04, वाहन व्यवसाय (रु.10 लक्ष पेक्षा जास्त व 15 लक्ष पर्यंत) 04, - एकुण 16

शाखा कार्यालयाचे नांव - जुन्नर - योजनेचा तपशिल -एन.एस.टी.एफ. डी.सी कर्ज योजना. - स्वयंसहायता बचत गट (रु.5 लक्ष)-10, ऑटो वर्कशॉप/स्पेअर पार्ट (रु.5 लक्ष)- 08 लहान उद्योग व्यवसाय (रू.2 लक्ष) - 17, - ऑटो रिक्षा / मालवाहतुक रिक्षा (रू. 3लक्ष) - 04, वाहन व्यवसाय (रु.10 लक्ष पेक्षा जास्त व 15 लक्ष पर्यंत) 0, - एकुण 39 तरी उपरोक्त जिल्ह्यामधील आदीवासी समाजातील इच्छुक उमेदवारांनी www.mahashabari.in या संकेत स्थळाच्या माध्यमातून दि. 07 एप्रिल 2025 पर्यंत ऑनलाईन कर्ज फॉर्म भरण्यासाठी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ शाखा कार्यालय, जुन्नर यांचे कडून आवाहन करण्यात येत आहे. तसेच कोणत्याही प्रकारे ऑलाईन अर्ज स्विकारले जाणार नाही. अधिक माहितीसाठी कार्यालयास संपर्क साधण्याचे आवाहन शाखा व्यवस्थापक शबरी आदिवासी वित्त व विकास महा. मर्या. शाखा जुन्नर (पुणे) रा. भ. पाटील यांनी केले आहे. (संपर्क क्र. 02132-295473)

# एप्रिलअखेर होणार विमानाचे टेकऑफ



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर-गोव्यासाठी फ्लाय 91 या कंपनीला 72 सीटर विमानसेवेला डीजीसीआएने मंजुरी दिल्यानंतर येत्या एप्रिल महिन्याच्या अखेरीस विमान टेकऑफ घेणार असल्याची शक्यता आहे. विमानसेवेसाठी लागर्णाया इंधन पंपाचा प्रश्न आहे.परवानगी मिळाल्यानंतर आता विमान उडेल की पुन्हा प्रतीक्षा करावी लागेल, अशी सोलापुरकरांत संभ्रमावस्था आहे.

विमानसेवेसाठी अडसर ठरणारी सिध्देश्वर साखर कारखान्याची चिमणी जून 2023 मध्ये पाडण्यात आली. 60 कोटी रुपये खर्च करुन होटगी रोडवरील विमानतळाचे नूतनीकरण करण्यात आले. विधानसभा निवडणुकीच्या आधी सप्टेंबर 2024 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या विमानतळाचे उद्घाटनही करण्यात आले. फ्लाय 91 कंपनीने डिसेंबर 2023 अखेर विमानसेवा सुरू करण्याची घोषणा केली. परंतु विमान काही उडालेच नाही. फ्लाय 91 कंपनीने 42 सीटरऐवजी 72 सीटर विमानसेवेला परवानगी मागितली. मागील दोन महिन्यांपासून परवानगी रखडली होती. अखेर आता डीसीसीआयएने परवानगी दिली असून, प्रत्यक्ष विमानसेवेला कधी सुरुवात होणार याची सोलापूरकरांना प्रतीक्षा आहे. तिकीट बुकींग आणि स्लॉट निश्चित झाल्यानंतर प्रत्यक्षात विमानसेवेला प्रारंभ होणार आहे. ते एप्रिल महिनाअखेर पूर्ण होईल, असे जिल्हा प्रशासनातील एका अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

# लांब पल्ल्याच्या नियोजनाने स्थानिक बसचा खोळंबा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एस.टी. महामंडळाकडून दरवर्षी उन्हाळ्यामध्ये जादा बस वाहतुकीचे नियोजन केले जाते. यावर्षीही 15 एप्रिलपासून राज्यातील विविध भागांत बस धावणार आहेत. एकीकडे बसची अपुरी संख्या असताना दुसरीकडे मात्र लांब पल्ल्याच्या बसेस पाठविण्याचे नियोजन केले जात आहे. त्यामुळे स्थानिक बस फेऱ्यांचा खोळंबा होण्याची शक्यता आहे. सोलापूर विभागाकडून यंदा 62 बसेसमधून वाहतुकीचे नियोजन आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून समाजातील विविध घटकांसाठी प्रवासात सवलती दिल्या जात आहेत. त्यामुळे दिवसेंदिवस प्रवाशांची संख्या वाढत आहे. त्यातच महिला प्रवाशांच्या संख्येत भर पडत आहे. दुसरीकडे एसटी महामंडळाच्या उत्पन्नात वाढ व्हावी, याकरिता जादा बस वाहतुकीचे नियोजन केले जात आहे. मात्र, हे नियोजन करीत असताना इतर बसफेऱ्यांवर परिणाम होणार नाही, याचाही विचार करणे आवश्यक झाले आहे. सोलापूर विभागात सोलापूरसह आठ आगारांचा समावेश होतो. या सर्व आगारांतून 650 पेक्षा अधिक बस राज्यातील कानाकोर्पयात धावतात. मात्र, यातील अनेक बस नादुरुस्त होत असल्याने अनेकदा बस फेऱ्यावर परिणाम होतो. दिवसभरात पाच ते 10 बस दुरुस्तीच्या कारणाने आगारात दाखल होतात. त्यातच उन्हाळ्यात बस नादुरुस्तीचे प्रमाणही अधिक होते. परिणामी, बस फेऱ्या रद्द झाल्यामुळे प्रवाशांना ताटकळत इतर बसची वाट पाहावी लागते.

मागील अनेक वर्षापासून परभणी एसटी महामंडळाच्या ताफ्यात अपेक्षित बस दाखल झाल्या नाहीत. त्याच बसवर जिल्ह्यातील एसटीचा डोलारा सुरू आहे. यंदा महामंडळाकडून 15 एप्रिल ते 15 जूनपर्यंत जादा बसचे नियोजन केले आहे. या बस पुणे, कोल्हापूर, धाराशिव, स्वारगेट यासह अन्य मार्गावर धावणार आहेत. या सर्व बस लांब पल्ल्याच्या राहणार आहेत. दुसरीकडे मात्र स्थानिक गावांना वेळेवर बस उपलब्ध होत नसल्याची ओरड होताना दिसत आहे. अनेक भागात बस फेऱ्यांची संख्या घटल्याचे दिसून येत आहे. ग्रामीण भागात बसची मागणी असूनही पुरवठा होत नसल्याने अनेक गावांना आजही बसची प्रतीक्षा आहे. त्यामुळे उत्पन्न वाढीबरोबरच स्थानिक प्रवाशांचा खोळंबा होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे.

# कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण योजनेंतर्गत - जमीनी बाबत जाहिर आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दि.14 ऑगष्ट 2018 अन्वये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील दारिद्रयरेषेखालील भूमीहीन कुटुंबांना 4 एकर जिरायती व 2 एकर बागायती जमिन उपलब्ध करून देण्यात येते

सदर योजनेंतर्गत मौजे पिरटाकळी ता. मोहोळ, जि. सोलापूर खालील तपशीलाप्रमाणे जमीन खरेदी करणेची प्रक्रीया सुरू आहे. खरेदी करावयाच्या जमीनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहेः-

**जमीन विक्री करणाऱ्या व्यक्तीचे नाव -**
श्री. सागर उत्तम काकडे
**जमीन उपलब्ध असलेल्या गावाचे नाव-**
मौजे सावळेश्वर ता. मोहोळ
**विक्री करण्यात येणाऱ्या जमीनीचा गट क्रमांक-**
292/2/ब/2

**एकूण जमीन -** 0.81 हे. आर

उपरोक्त शेतजमीनीवर कोणाचे खरेदीखत, साठेखत, लीज, कर्ज, दान, बक्षीस, पोटगी, वारसा अगर अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क व अधिकार असल्यास संबंधितांनी सदरचे नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 07 दिवसांच्या आत सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सोलापूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सात रस्ता, 3 रा मजला दुरध्वनी क्रमांक 0217-2734950 येथे योग्य त्या कागदपत्रांनिशी लेखी हरकत घ्यावी अन्यथा वरील प्रमाणे मुदतीत कोणाची हरकत, तक्रार न आल्यास खरेदीचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या तक्रारीचा फेरविचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख -28 मार्च 2025

अशी माहिती सदस्य सचिव, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना जिल्हास्तरीय समिती तथा सहायक आयुक्त, समाज कल्याण सोलापूर सुलोचना सोनवणे यांनी दिली आहे.

# जिल्हास्तर युवा पुरस्कारासाठी अर्ज दाखल करण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हयातील युवांनी केलेले समाजहिताच्या कायार्चा गौरव व्हावा व त्यांना प्रोत्साहन मिळाय यासाठी जिल्हयातून एक युवक, एक युवती, एक नोंदणीकृत संस्था यांना जिल्हास्तर युवा पुरस्कार देण्यात येतात.

पुरस्काराचे स्वरुप गौरवपत्र, सन्मानपत्र, रोख पुरस्कार व्यक्तीस प्रत्येकी दहा हजार रुपये संस्थेसाठी गौरवपत्र सन्मानचिन्ह रोख पुरस्कार रुपये पन्नास हजार असे असेल. सदरील पुरस्कारासाठी युवक युवतीस अथवा नोंदणीकृत संस्थांनी ग्रामीण व शहरी भागांत केलेले सामाजिक कार्य राज्याचे शासन संपत्ती जतन व संवर्धन तसेच राष्ट्र उभारणीच्या विकासासाठी सहाय्यभूत ठरणारे कार्य, समाजातील दुर्बल घटक, अनुसूचित जाती, जमाती व जनजाती आदिवासी भाग इ. बाबतचे कार्य शिक्षण प्रौढ शिक्षण रोजगार, आरोग्य, पर्यावरण सांस्कृतिक कला, क्रीडा मनोरंजन, विज्ञान तंत्रज्ञान व्यवसाय, महिला सक्षमीकरण, स्त्रीभ्रूण, व्यसनमुक्ती तसेच युवांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले कार्य, राष्ट्रीय एकात्मतेस प्रोत्साहन देणारे कार्य, नागरी गलिच्छ वस्ती सुधारणा, झोपडपट्टी, आपत्ती व्यवस्थापन तसेच स्थानिक समस्या, इत्यादी बाबत कार्य साहस इत्यादी बाबतचे केलेल्या कार्याचे गुणांकन दिनांक 01 एप्रिल ते 31 मार्च या कालावधीतील गत तीन वषार्ची केलेली कार्य / कामगिरी विचारात घेण्यात येऊन जिल्हा युवा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

सदर माहिती व अजार्साठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कुमठा नाका सोलापूर यांचेशी संपर्क साधावा व युवक युवती व नोंदणीकृत संस्थांनी पुरस्कारासाठी परिपूर्ण अर्ज दिनांक 15 एप्रिल 2025 पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केलेले आहे.


# अक्कलकोट नगर परिषद
## जि.सोलापूर

दूरध्वनी : 02181-220253
ई-मेल आयडी - comcakkalkot123@gmail.com
जा.क्र./अनप/कावि/विवि/२०२५/७
दि. ०२/०४/२०२५

## निविदा सूचना

अक्कलकोट नगर परिषद न. प. निधी व इतर शासकीय निधी अंतर्गत खालील दर्शविलेल्या कामासाठी अनुभवी नोंदणीकृत कंत्राटदाराकडून/निविदाधारकाकडून निविदा मागवीत आहे. कोरे निविदा फॉर्म सुट्टीचे दिवस वगळून दि. १०/०३/२०२५ पर्यंत कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत खालीलप्रमाणे निश्चित किमत जमा केल्यानंतर न. प. कार्यालयात विद्युत विभागाकडे विकत मिळतील.

१) कंत्राटदाराने मोहरबंद निविदा दोन लिफाफा पद्धतीत मुख्याधिकारी नगर परिषद अक्कलकोट यांच्याकडे दिनांक १०/०३/२०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजेपर्यंत सादर कराव्यात. २) निविदासोबत बयाना रक्कम रोख जमा करणे आवश्यक आहे. ३) जमा केलेल्या बयाना रकमेचा पावती क्रमांक सीलबंद लिफाफ्यावर नमूद करावा ४) प्राप्त झालेल्या निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी ठीक ०५.०० वाजता मा. मुख्याधिकारी तथा प्रशासक यांच्या दालनात समक्ष उघडण्यात येतील. ५) पात्र निविदा धारकाच्या बिलातून अनामत रक्कम, आयकर,GST, कामगार उपकर इ. बाबींची रक्कम नियमानुसार कपात करण्यात येईल. ६) इतर अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून विद्युत विभागात पहावयास मिळतील. ७) कोणतीही निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार न. प. ने राखून ठेवला आहे. ८) निधी उपलब्धतेनुसार कामाचे देयक प्रदान करण्यात येईल याची नोंद घेऊन निविदा प्रक्रियेत सहभाग घ्यावा.

| अ. क्र. | कामाचा तपशील | अंदाजपत्रक रक्कम | बयाणा रक्कम | अनामत रक्कम | निविदा फॉर्म रक्कम फीस | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्याधिकारी निवास स्थानाचे इलेक्ट्रीकल फिटींग करणे. | १,५०,५२६/- | ३०२०/- | १२,०५०/- | ५९०/- | ३० दिवस |
| २ | अक्कलकोट शहरातील विविध ठिकाणाचे कारंजासाठीचे विद्युत काम करणे. | - | ४०००/- | १६,०००/- | ५९०/- | ३० दिवस |
| ३ | नगर परिषद कार्यालयातील १० केव्हीए जनरेटरची दुरुस्ती करणे. | - | २०००/- | ८,०००/- | ५९०/- | ३० दिवस |
| ४ | नगर परिषद कार्यालयातील सोलर इनव्हर्टरची दुरुस्ती करणे. | - | २०००/- | ८,०००/- | ५९०/- | ३० दिवस |

**सही/-**
**डी. एस. शेळके**
**विद्युत अभियंता**
**अक्कलकोट नगर परिषद**

**सही/-**
**आर. डी. डाके**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**अक्कलकोट नगर परिषद**